# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


## प्रेस नोट

दिनांक :- २७/०९/२०२४

## महामार्गावर दुचाकीस्वारांची लुटमार करणारा आतंरजिल्हयातील गुन्हेगार जेरबंद चोरीच्या १२ मोटर सायकल हस्तगत - जबरी चोरी व मोटर सायकल चोरीचे ०६ गुन्हे उघडकीस नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखा व वावी पोलीसांची कामगिरी

---

दिनांक ११/०९/२०२४ रोजी रात्रीचे सुमारास सिन्नर - शिर्डी महामार्गावर पाथरे शिवारात, अज्ञात आरोपींनी तोंडास काळे कपडे बांधुन रस्त्यावरून येणा-या एका दुचाकीस्वारास अडवून त्यास मारहाण करून त्याचेकडील मोबाईल फोन व रोख रूपये असा एकुण २१ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला होता. सदर घटनेबाबत वावी पोलीस ठाणेस गुरनं ३७९/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०९(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, व अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांनी महामार्गांवरील नाउघड जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी जिल्हयाचे सीमावर्ती भागातील गुन्हेगारांचा आढावा घेवून स्थानिक गुन्हे शाखा व वावी पोलीस ठाणेस सुचना दिलेल्या होत्या.त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांनी वरील गुन्हयातील आरोपीतांची गुन्हा करण्याची पध्दत व अभिलेखावरील आरोपीतांची माहिती घेवून पथकास तपास करणेबाबत मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे वरील गुन्हयाचे समांतर तपासात पथकास मिळालेल्या गुप्त बातमीनुसार अहमदनगर जिल्हयातील काही संशयीत नाशिक जिल्हयाचे सीमावर्ती भागात येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरून पथकाने पाथरे फाटा शिवारात सापळा रचुन संशयीत नामे **१) सलीम रहीम पठाण, वय २९, रा. रायते, ता.येवला, हल्ली काळेमळा, शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर** यास शिताफिने ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने व त्याचा साथीदार नामे २) बबलु युसूफ शेख, रा. गणेशनगर, राहाता, जि.अहमदनगर याचेसह वरील गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

यातील ताब्यात घेतलेला आरोपी सलीम पठाण याचे कब्जातुन जबरीने चोरून नेलेले ०३ मोबाईल फोन, गुन्हयात वापलेली टीव्हीएस स्टार सिटी मोटर सायकल असा एकुण १,१०,०००/- रूपये किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीस वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्याची तीन दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली होती. सदर गुन्हयाचे तपासात स्थागुशाचे पथक व वावी पोलीसांनी यातील आरोपी **सलीम रहीम पठाण** याचेकडे सखोल तपास केला असता, त्याने त्याचे साथीदारासह कोपरगाव, राहुरी, शिर्डी, वावी परिसरात रात्रीचे सुमारास एकटया दुचाकीस्वारांना अडवून जबरी लुटमार केल्याची कबुली दिलेली आहे. तसेच त्याचा साथीदार नामे २) बबलु युसूफ शेख, रा. गणेशनगर, राहाता याचा शोध घेतला असता, तो येवला शहर पोलीस ठाणेकडील मोटर सायकल चोरीचे गुन्हयात अटक असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर बाबत अधिक चौकशी केली असता वरील आरोपी सलीम पठाण व त्याचा साथीदार बबलु शेख यांनी दोघांनी मिळुन नाशिक जिल्हयातील येवला शहर, येवला तालुका, कोपरगाव, शिर्डी, संगमनेर परिसरात मोटर सायकली चोरी केल्याची कबुली दिल असून सदर आरोपीचे कब्जातून **चोरीच्या एकुण १२ मोटर सायकल** हस्तगत करण्यात आलेल्या आहेत, त्या खालील प्रमाणे

| अ.क्र | गाडी प्रकार क्र | चेसिस नंबर | इंजिन नंबर | पोलीस स्टेशन गु र नं |
|---|---|---|---|---|
| १ | होंडा युनिकॉर्न<br>MH 15 FP 7970 | ME4KC09MHG8073074 | KC09E87072994 | **येवला शहर पोस्टे<br>गु र नं २७३/२०२४** |
| २ | बजाज पल्सर<br>MH BY 3512 | MD2A11CX9MCL51973 | DHXCML65960 | येवला शहर परिसर<br>चोरीस गेली आहे |
| ३ | होंडा शाईन<br>MH 17 BT 0878 | ME4JC651HGT306430 | JC65ET0453079 | **कोपरगाव तालुका पोस्टे<br>गुरनं २३७/२०२४** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | काळे रंगाची हीरो स्प्लेंडर MH 15 HP 0188 | MBLHAW114M5BO3475 | HA11EVM5B00952 | **येवला तालुका पोस्टे गुरनं ४२३/२०२४** |
| ५ | हीरो स्प्लेंडर MH 17 CY 7022 | MBLHAW228P9C17080 | HA11E7P9C16959 | कोपरगाव शहर पोस्टे हददीतुन चोरलेली |
| ६ | काळे रंगाची बजाज प्लॅटीना MH 15 CX 0832 | MD2DDDZZZTWG36644 | DZMBTG05382 | येवला तालुका परिसर |
| ७ | काळे रंगाची हीरो होंडा स्प्लेंडर | खोडलेला | खोडलेला | ------ |
| ८ | काळे रंगाची हीरो डीलक्स MH 17 CK 1673 | MBLHAW029KHH02328 | HA11ENKHH03983 | **शिर्डी पोलीस स्टेशन ५०३/२०२४** |
| ९ | TVS कंपनीची रायडर MH 17 DB 6235 | MD625AF99R1B00297 | AF9BR1700257 | **शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं ४६२/२०२४** |
| १० | होंडा कंपनीची निळा रंग दिलेली अॅक्टीवा MH 15 FZ 6251 | ME4JF507FH7189574 | JF50E75189621 | येवला शहर परिसर चोरीस गेली आहे |
| ११ | होंडा कंपनीची सफेद रंगाचा अॅक्टीवा MH 15 DQ 6934 | ME4JC448HC7521910 | JC44E5522082 | येवला शहर परिसर चोरीस गेली आहे |
| १२ | काळे रंगाची हिरो एच.एफ. डिलक्स MH 17 BG 1909 | MBLHA11ALE9M08446 | HA11EJE9M26173 | तळेगाव दिघे परिसर चोरीस गेली आहे |

यातील आरोपी **सलीम रहीम पठाण** याचे कब्जातुन वरील प्रमाणे **चोरीच्या १२ मोटर सायकल** व लुटमार केलेले **०३ मोबाईल फोन** असा एकुण किं.रु. **७ लाख ७५ हजार रूपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला असून येवला शहर, कोपरगाव शहर, येवला तालुका, शिर्डी पोलीस ठाणेस दाखल असलेले मोटर सायकल चोरीचे एकुण ०५ गुन्हे व वावी पोलीस ठाणेस दाखल असलेला जबरी चोरीचा ०१ असे **एकुण ०६ गुन्हे उघडकीस** आलेले आहे. वरील गुन्हयांचे तपासात यातील आरोपींकडून मोटर सायकल चोरी व जबरी चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, सपोनि संदेश पवार, वावी पो.स्टे.चे सपोनि गणेश शिंदे, पोउनि के.एस.सोनवणे, तसेच स्थागुशाचे सपोउनि नवनाथ सानप, पोना विनोद टिळे, हेमंत गिलबिले, संदिप नागपुरे, प्रदिप बहिरम यांचे पथकाने वरील गुन्हे उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.